राज्यात संकलीत होणाऱ्या दुधाचे मानक निश्चित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमएलके-२०२३/प्र.क्र.६३/पदुम-८(७०२२३४)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय- विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २९ नोव्हेंबर, २०२३

**वाचा:-** १. केंद्र शासन, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, (भारतीय खादय सुरक्षा व मानक प्राधिकरण) अधिसूचना, भाग III-खंड ४ दि.१२/१०/२०१७
२. मा.मंत्री पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास, यांचे अध्यक्षतेखाली आयोजित बैठक दि.२१.११.२०२३

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने, संदर्भ क्र.१येथील अन्न सुरक्षा व मानक (अन्न पदार्थ मानक आणि अन्न संमिश्रे) अधिसूचनेतील उप-नियम २.१.२ मधील २ (b) तक्यातील स्तंभ (४) आणि (५) मध्ये वेगवेगळया वर्गवारीच्या दुधातील किमान स्निग्धांश (FAT) व किमान स्निग्धांश व्यतिरीक्त इतर घन पदार्थ (SNF) यांची सुधारीत मानके विनिर्दिष्ट केली आहे. सदर अधिसूचनेचा आधार घेऊन, महाराष्ट्र राज्यात संकलित होणाऱ्या वेगवेगळया वर्गवारीच्या दुधातील गुणप्रत स्विकृतीमध्ये एकसुत्रता येण्यासाठी दुधातील किमान स्निग्धांश (FAT) व किमान स्निग्धांश व्यतिरीक्त इतर घन पदार्थ (SNF) निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

शासन या निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात संकलित होणाऱ्या वेगवेगळया वर्गवारीच्या दुधातील किमान स्निग्धांश (FAT) व किमान स्निग्धांश व्यतिरीक्त इतर घन पदार्थ (SNF) ही मानके खालीलप्रमाणे निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | दुध श्रेणी | किमान फॅट (टक्केवारी) | किमान एसएनएफ (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | गाय दुध | ३.२ | ८.३ |
| २ | म्हैस दुध | ६.० | ९.० |
| ३ | बकरी व मेंढी दुध | ३.५ | ९.० |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११२९१८०९२९२८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2023.11.29 18:12:41 +05'30'

**( अश्विनी यमगर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल याचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय, मुंबई.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (पदु), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट राज्य सहकारी दुध महासंघ मर्या., महानंद, मुंबई ..................आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट राज्य सहकारी दुध महासंघ मर्या., महानंद, मुंबई यांनी सदर शासन निर्णयास आपल्या स्तरावरून व्यापक प्रसिध्दी द्यावी.
११. निवडनस्ती.